## <u>प्रेस नोट दिनांक ०४/०९/२०१८</u>

## <u>अमेरीकन डॉलर दाखवुन लुटणारी टोळीस अटक- हडपसर पोलीसांची कारवाई</u>

हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.९७४/२०१८ भा.द.वि.क.४०६,४२० मधील फिर्यादी यांनी फिर्यादी यांची अज्ञात आरोपी यांनी जमीनीच्या व्यवहाराच्या बहाण्याने हडपसर गाव येथे बोलावुन त्यांना अमेरीकन २० डॉलरची नोट दाखवुन आमचेकडे अशा प्रकारच्या १२१० नोटा आहेत असे सांगुन फिर्यादी यांचेकडुन ९०,०००/- रुपये रोख रक्कम घेवुन त्याबदल्यात १२१० अमेरीकन डॉलर्स देत आहोत असे सांगुन रुमालामध्ये पेपरचा बंडल बांधुन दिला. व सदर ठिकाणाहुन पळुन जावुन फिर्यादी यांची फसवणुक केलेली आहे.

सदर गुन्हयाच्या तपास चालु असताना हडपसर पोलीस स्टेशनकडील नितीन मुंढे व अकबर शेख यांना त्यांचे गोपनिय बातमीदारमार्फत बातमी मिळाली की, सदर गुन्हयातील आरोपी सोनार आळी,हडपसर पुणे येथे येणार आहेत. त्यावरुन तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, पोना/प्रताप गायकवाड, पोना/विनोद शिवले, पोशि/ नितीन मुंढे, पोशि/ अकबर शेख, पोशि/ शशिकांत नाळे यांनी सापळा रचुन आरोपी नामे १) नाहीद अमिन रहमान,वय – २६ वर्षे,रा.३६,देवेंद्र चंदा,डे रोड, टेंगरा कलकत्ता,राज्य प.बंगाल २) हफीझुल ऊर्फ यामीन रुफीकुल सरदार,वय – २३,गणरास पुर, उत्तर २६ परगणा,राज्य – प.बंगाल ३)समोन अत्तियार खलिफा,वय – ३१ वर्षे,रा.गाव शोलवा,शोरुकनगर,उत्तर २४ परगाणा,राज्य प.बंगाल ४) ओनिक फकरुल शेख,वय – २९ वर्षे, रा. मुळ चटुग्राम,थाना ढाका, बांगलादेश कायम पत्ता - घर नं.३००४, ई ब्लॉक,जे जे कॉलनी,भवाना,नॉर्थ वेस्ट दिल्ली ३९ ५) शाहीद ऊर्फ सैदुल उबेद शेख,वय – २८ वर्षे,रा.घर नं.३९४१, ई ब्लॉक,जे जे कॉलनी,भवाना,नॉर्थ वेस्ट दिल्ली ३९ सर्व सध्या रा.सचिन बधे यांचे घर,गोंधळे नगर,हडपसर पुणे. यांना अटक करुन त्यांचेकडुन १०४ अमेरीकन डॉलर्स, रुमालामध्ये गंडाळलेला पेपरचा बंडल, २५,०००/- रोख रक्कम , व ५ मोबाईल असा एकुण ७०,०००/- रुपयांचा मुददेमाल जप्त केला असुन सदर आरोपींनी तपासदरम्यान भोसरी, आळंदी,देहुरोड,दत्तवाडी, येरवडा,हडपसर, वानवडी इत्यादी ठिकाणी राहील्याचे व अशाच प्रकारचे गुन्हे केले असल्याची कबुली दिली आहे. सदर बाबत आम्ही संमधित पोलीस स्टेशन तसचे पिंपरी चिंचवड आयुक्तालय येथे खबर देवुन अशा प्रकारच्या गुन्हयांची चौकशी करुन आरोपींना ताब्यात घेणेबाबत कळवित आहोत. तसेच सदर आरोपी हे दर १ महीन्याला घरे बदलत असल्याचे त्यांनी तपासादरम्यान सांगितले आहे. सदर आरोपींना आज दिनांक ०४/०९/२०१८ रोजी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो यांचेसमक्ष हजर करीत असुन त्यांची पोलीस कस्टडी रिमांडची मागणी करण्यात आलेली आहे.

सदर कामगिरी हि श्री सुनिल फुलारी, मा.अपर पोलीस आयुक्त सो, पुर्व विभाग. श्री.प्रकाश गायकवाड,मा.पोलीस उप आयुक्त सो,परि-५. मिलिंद पाटील, सहा.पोलीस आयुक्त सो,हडपसर विभाग. यांचे मार्गदर्शनाखाली व **सुनिल तांबे, वपोनि, हडपसर पो.स्टे., पोनि गुन्हे कुंभार यांचे सुचनेनुसार हडपसर पोलीस स्टेशन तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, पोना/प्रताप गायकवाड, पोना/विनोद शिवले,युसुफ पठाण,पोशि/ नितीन मुंढे, पोशि/ अकबर शेख, पोशि/ शशिकांत नाळे यांनी केलेली आहे.**